ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# इतिहास लेखनातील स्त्रीवादी प्रवाह

**प्रा. डौले वैशाली नामदेव**
लोकनेते रामदास पाटील धुमाळ,
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

★★★

**सारांश** – **19** व्या शतकाच्या शेवटी इंग्लंड, अमेरिकेत झालेल्या मताधिकार आंदोलनापासून जागतिक स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवात झाली. २०व्या शतकात स्त्री हक्क व स्त्री स्वातंत्र्यासाठी अनेक आंदोलने झालेली दिसून येतात. अनेकदा स्त्रीवादी चळवळी पुरुशांच्या पुढाकाराने विकसित झालेल्या दिसून येतात. प्रस्तुत शोध निबंधात इतिहास लेखनातील स्त्रीवादी प्रवाह यावर अल्पसा प्रकाष टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीजशब्द**– **स्त्री, स्त्रीवादी, इतिहास, प्रवाह.**

**उद्दिष्टे**–

१) स्त्रीवादी चळवळीचा अर्थ जाणून घेणे.
२) स्त्रीवादी चळवळीच्या विविधशाखांवर प्रकाश टाकणे.
३) स्त्रीयां विषयीच्या इतिहास लेखनाचा आढावा घेणे.
४) स्त्री वादी इतिहास लेखनाची संकल्पना समजावून घेणे.

**गृहितके** –

१) स्त्री वादी चळवळीमुळे स्त्रीला स्वतःच्या शक्तीचे भान आले.
२) स्त्रीवादी इतिहास लेखन वर्तमानकालीन स्त्रियांची परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले दिसून येते.
३) स्त्री चळवळीचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहासाची मांडणी स्त्रीवादी इतिहास करतो.

**संशोधन पध्दती**– वर्णनात्मक, ऐतिहासिक, विष्लेशणात्मक विषय ज्ञान–स्त्री वाद म्हणजे स्त्रीला स्वःताच्या शक्तीचे आलेले भान होय. एका बाजूने अन्याय, अत्याचार, शोषण या खाली दडपण्याचे याचे भान आणि दुसऱ्या बाजूला मानव जातीच्या प्रगती मधील सहभागाचे भान स्वतः ची किंमत स्वतःचा मान, स्वतःची अस्मिता यांचे भान म्हणजे स्त्रिवाद किंवा फेमिनिझम. जगाकडे नव्या चश्म्यातून पाहयला शिकणे म्हणजे फेमिनिझम फेमिनिझम ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. Feminism हा मुळ शब्द लॅटिन भाषेतील आहे. विकिपीडिया व ऑक्सफर्ड शब्दकोशा प्रमाणे स्त्रीयांचा समान, राजकीय, सामाजिक ,आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांची व्याख्या करून त्यासाठी लढणारे व हे हक्क कायम ठेवण्यासाठी लढणाऱ्या वेगवेगळ्या विचार सरणी व आंदोलने हे एकत्रितपणे म्हणजे स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारुन स्त्रीपुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचार प्रवाह. पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमुळे केवळ भारतात नव्हे तर जगाच्या इतिहासात स्त्रिया दीर्घकाळ शोषित व उपेक्षित राहिलेल्या पाश्चात्त्य देशात मात्र १८व्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. विकासित, विकसनशील देशात स्त्रीचळवळीचा अभ्यास वेगवेगळ्या टप्प्यावर केलेला आहे स्त्रीवाद म्हणजे समान हक्क, समान दर्जा ,व समान संधी होय. जगभरातील सर्व समाज व्यवस्थांनी स्त्रीच्या बाबतीत दुय्यम स्थान दिले गेले. सर्वत्र पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती स्त्रीला स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही नव्हते. स्त्रीला पिता पुत्र पती यांच्या वर्चस्वाखाली राहावे लागत होते. युरोपमध्ये सोळाव्या शतकात धर्मसुधारणा चळवळ ,पुनरुज्जीवन चळवळ, फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती यासारख्या अनेक घटनांनी समाज जीवन हे ढवळून निघाले या सर्वांमुळे कला, विद्या साहित्य ,ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक, आर्थिक ,राजकीय, क्षेत्रात बदल झाले यातून नवीन मूल्यव्यवस्था जन्माला आली . पाश्चात्त्य देशात स्त्रीया आपल्या अधिकारासाठी झगडू लागल्या. यातूनच पुढे स्त्री अभ्यासाची सुरुवात झाली. त्यातून स्त्रीयांच्या दडपणुकीच्या कारणांचा शोध घेऊन स्त्री–पुरुष समानतेच्या विचारातून स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला तो पुढील प्रमाणे.

**स्त्रीवादी विचारसरणीचे प्रमुख प्रवाह**

**१) उदारमतवादी स्त्री वाद**

**२) मार्क्सवादी स्त्रीवाद**

**३) जहालमतवादी स्त्रीवाद**

**४) समाजवादी स्त्रीवाद**

**५) काळा स्त्रीवाद**

**६) पर्यावरणी स्त्रीवाद** – अठराव्या शतकात उदारमतवादी स्त्रीवादाचा युरोपमध्ये उदय झाला. या उदारमतवादी विचारसरणी स्त्री–पुरुष समानेतेवर भर देतात. स्त्रीने शिक्षण घेतलेच पाहिजे. जॉन स्टुअर्ट मिल, हॅरिएट टेलर दोघांनीही स्त्री–पुरुषांना सारखेच शिक्षण दिले पाहिजे. स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने नागरी हक्क व आर्थिक संधी ही मिळाल्या पाहिजे. जॉन स्टुअर्ट मिलचा सब्जेक्शन ऑफ वुमेनहा ग्रंथ उदारमतवादी स्त्रीयांसाठी महत्त्वाचा मानला जातो. पत्नी व माता म्हणून स्त्रीयांना कामामध्ये शक्ती व वेळ खर्च होतो . स्त्रियांची उसंत व एकाग्रता ही सततच्या कामामुळे स्त्रियांकडून हिरावून घेतली जाते. एमली डेव्हिस, फ्लोरेंन्स, नाईटेगल, फ्रान्सिस

पावर कॉल या स्त्रियांनी स्त्रीस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केलेला दिसून येतो.

**मार्क्सवादी स्त्रीवाद**—मार्क्सवादी स्त्री वादाने उदारमतवादी स्त्रीवादी विचारांतील कमतरता शोधून स्त्रीवाद हा अधिक मजबूत केला मार्क्सवादी स्त्रीवादी परंपरेत स्वप्नाळू समाजवादी विचारवंत फुरियर , रॉबर्ट ओवेन, त्याच प्रमाणे व्हीलर यांनी स्त्री प्रश्नासंबंधी विचार मंथन केलेले दिसते. भांडवल शाहीच्या उदया बरोबर स्त्रीचे आणखी अवमूल्यन झाले. स्त्रीयांचे श्रम स्वस्तात मिळून मजुरी कमीत ठरवली गेली. लिंगभाव सत्तासंबंध व समाजातील उत्पादनाचा व पुनरुत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचे शोषण कसे होते याचे विष्लेशण मार्क्सवादी स्त्री वादाने केले.

फ्रेडरिक एंगल्स यांचाद ओरिजिन ऑफ द फॅमेली, प्रायव्हेट प्रोपर्टी अण्डद स्टेटहा मार्क्सवादी श्री वादी ग्रंथ होय. यामध्ये स्त्रियांचे शोषण हे निसर्गदत्त नसून ऐतिहासिक कालक्रमात कुटुंब व्यवस्था खाजगी मालमत्ता व राज्य संस्था हे कसे सुरु झाले याची मीमांसा केलेली आहे. मार्क्सवादी विचारवंत उदा. एंगल्स, कार्ल मार्क्स

**जहालवादी स्त्रीवाद** — जहाल स्त्रीयांच्या दुय्यम स्थानांची ची चिकित्सा करतो ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रियांचे शोषण सर्वप्रथम झालेले दिसून येते. राज्य न्यायव्यवस्था अर्थव्यवस्था समाजातील विविध सामाजिक संस्था कुटुंब विवाह, धर्म, कला, साहित्य , तत्वज्ञान इ. संस्कृतीची विविध अंगे अषा सर्वच क्षेत्रांत व्यापून असलेली दिसून येतात. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लैंगिक, भौतिक मानसिकता शोषणाला कारणीभूत ठरते. जहालवादी विचारवंत उदा. शुलामिय फायरस्थने, केटमिलेट, जर्मेन ग्रिअर

**समाजवादी स्त्रीवाद** — समाजवादी स्त्रीवादाचा जन्म मार्क्सवादी स्त्रीवादातून झाला जूलिएट मिचेल या समाजवादी विचार वतीनेवुमन्स इस्टेटया ग्रंथात भांडवलशाही विषयी व पितृ सत्तेविषयी विष्लेषण केले. स्त्री विषयक व पुरुश विषयक धारणा, लिंग दृश्टया कामाचे विभाजन याविषयीचा विचार जोपर्यंत बदलत नाही. तोपर्यंत स्त्री पुरुष समानता अस्तित्वात येणार नाही. असे विचार देखील मिचलने सायको घ्नॅलिसिस ॲण्ड फेमिनिझम या ग्रंथात मांडले. समाजवादी विचारवंत—उदा. हायटी हार्टमन, आइसिंग यंग,ज्युलिएट मिचेल

**काळा स्त्रीवाद** — बेल हुक्स या काळ्या विचार वंतीने मांडलेले स्त्रीवादी चळवळ आणि काळ्यांची यापासून वेगळी काळ्या स्त्रियांनी आपली वेगळी चूल का मांडावी?

कृष्णवर्णीय स्त्रिया कायमच समाजातील अधिकच शोषित गट राहिलेला दिसून येतो. पितृसत्ता, वंशवाद व वसाहतीक अशा पाशातून पीडित अशी काळ्या स्त्रीवादी भूमिका होती. कोम्बही रिव्हरी कलेक्टीव्ह या गटाने काळ्या स्त्रियांच्या मुक्ती मुळे वंशवाद, लिंग वाद व वर्गवाद यांचा शेवट होईल असे घोषित केले. काळ्या स्त्रीवादी विचारवंत—बेल हुक्स, घलिस वॉकर, जेला डेविस

**पर्यावरणीय स्त्रीवाद** — आपल्या सभोवतालचा निसर्ग, त्यामधील जैवविविधता, संसाधने यांचा उपयोग करून मानवाने प्रगती केली. परंतु वैज्ञानिक क्रांती नंतर भांडवलशाहीने निसर्गाची लुटालूट केली त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. वंदना शिवा, मारिया मिस, यासारख्या पर्यावरणीय स्त्रीवादांनी विज्ञान तंत्रज्ञानाची समीक्षा केली. स्त्रिया त्यांच्या जैविक जडणघडणी मुळे निसर्गतः हा भावनिक, हळव्या असतात. ऋतुचक्र, बाळंतपण, संगोपन या प्रक्रियांशी जोडलेले असल्यामुळे त्या निसर्गाला न ओरबडता त्या निसर्गाचे संवर्धन करतात. आफ्रिकेतील वंगारी मथाई व भारतातील मेधा पाटकर ही पर्यावरणवादी नेत्यांची उदा. आहे.

**निष्कर्ष**— स्त्री अभ्यासाने इतिहास या ज्ञान शाखेचे स्वरूप बदलले. स्त्रीवादाचे स्त्री बद्दलचे आकलन जसे बदलत गेले .तसे स्त्रीवादी इतिहास लेखनाचे स्वरूपही बदलले. स्त्रीवादी इतिहास लेखनाचा इतिहासाचा कालखंड आकलनावर, सामाजिक विष्लेशणावर आणि आणि सामाजिक बदलांच्या सिद्धांकनांवर प्रभाव पडला. जगभरातील विविध देशातील गटांनी स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली.उदा. भारतात महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नेत्यांनी स्त्रीमुक्तीचा विचार विकसित केला. इतिहास, राज्यशास्त्र अर्थशास्त्र समाजशास्त्र साहित्य या सर्वच शाखा स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून नवी मांडणी होताना आपणास दिसते.

***संदर्भ***

१) *विद्युत भागवत, शर्मिला रेगे, (संपादक) भारतातील समकालीन कळीचे प्रश्न स्त्रीवादी चळवळीचा आढावा.*

२) *विद्युत भागवत, षर्मिला रेगे, (संपादक) भारतातील समकालीन कळीचे प्रश्न स्त्रीवादी चळवळीचा चर्चा विषयचा आढावा.*

३) *डॉ. भारती नवथर, पुर्नवादाचा ऐतिहासिक अभ्यास (अप्रकाशित) लघुशोध प्रकल्प, २०१४*

४) *डॉ.भारती नवथर, पुर्नवादाचा ऐतिहासि अभ्यास (अप्रकाशित) लघुशोध प्रकल्प,२०१*

५) *प्रा.जास्वंदी वांबुरकर, (संपादक) इतिहासातील नवे प्रवाह , डायमंड पब्लिकेशन्स, २०१४*